# राशिभविष्य - फ़ेब्रुवारी, २०१३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

====================================================================

**(१) मेष -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्णकाळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईलसे दिसते. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. थोरामोठ्यांच्या ओळखीतून लाभ होतील. पगारवाढ होईल. कर्तृत्वसंपन्न मंडळीना बढती, अधिकार पद, उच्च पद, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. सामान्य नोकरदार मंडळीना, हातावर पोट असणाऱ्या मंडळीना अपार कष्ट, परिश्रम करूनच अपेक्षित अर्थसाहाय्य प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा लागेल. मित्रमंडळींशी वितुष्ट येणे शक्य आहे. उलट काही मंडळीना मित्रांपासून सुखसमाधानही लाभू शकेल. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. कलाक्षेत्राशी संबंधिते व्यापार-व्यवसाय असणारांना मात्र महिन्याचे पहिले वीस दिवस व्यवसायात अडचणी, अडथळे येत असल्याचा अनुभव येईल. महिन्याचे अखेरचे दहा दिवस अपेक्षापूर्तीचे, लाभदायक व सुखसमाधान देणारे जातील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल प्रतिकुल असल्यामुळे सतत सावधानतेने, संयमाने व सहनशीलतेने आचरण करणे आवश्यक होईल. स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य वा अन्य कारणांनी दांपत्यजीवनात सुखसमाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. जपा. कुमार्गी मित्रांपासून नुकसान संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या लहरी, अस्थिर, चंचल असा झाला असण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांशी मुकाबला करावा लागल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. विशेष करून या महिन्याचे पहिले तीन दिवस अधिक मनस्ताप देणारे असल्याचाच अनुभव येईल. पण शुक्राच्या अनुकुलतेने सुखसमाधान लाभेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल तर खाजगी नोकरदारांना व स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना मनस्ताप देणारा, कष्टदायक, कामाचा ताण देणारा असल्यामुळे प्रतिकुल असेल. पण मानसिक रोगतज्ज्य व द्रव पदार्थाचे व्यापारी यांना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अस्थिर मानसिक अवस्थेमुळे या राशीच्या काही मंडळीना नवीन प्रकारचा व्यवसाय सुरू करण्याची ऊर्मी येईल. पण त्यांनी मनाला ब्रेक लावणेच सुखाचे होईल. व्यापार-व्यवसाय-नोकरी परधर्मीयांशी संबंधित असेल अशा मंडळीना मात्र या महिन्याचा काळ लाभदायक होईल. साहित्यिक, चिकित्सक, संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण सहकाऱ्यांशी, मित्रांशी मतभेद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे गंभीर असे अनारोग्य होण्याची शक्यता नाही. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळीना संततीचे आजार वा अन्य समस्या यांमुळे अपेक्षित संततिसुख लभण्याची शक्यताही दिसत नाही. त्यामुळे कौटुंबिक सुखातही बाधा येऊ शकेल. दलाली, कमिशनवर व्यापार-व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना,

मुत्सद्दी राजकीय कार्यक्षेत्र असणारांना, सर्व प्रकारचे संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना, समाजसेवकांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, या राशीच्या नोकरदार मंडळीना काळ घरीदारी मनस्तापदायक व मानहानिकारक असल्याचाच अनुभव येणे संभवते. त्यामुळे काही मंडळींचे शारीरिक आरोग्यही बिघडू शकेल. जपा. पण जन्मकुंडलीत योग असतील तर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना भूमिलाभ, धनलाभ, मान, प्रतिष्ठा अशापैकी काही प्राप्त होण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना महिन्याच्या उत्तरार्धात गुरुकृपा, थोर मंडळींचा सहवास लाभेल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही.. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल; पण प्रवासात असह्य मनस्ताप व मानहानी होण्याची शक्यता जाणवते. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असणार आहे. मतभेद, कोणाशी कोणाचे न पटणे, स्थावरसंबंधी वाद हद्दीबाहेर जाणे, तसेच कुटुंबातील कोणाचे आजारपण अशा कारणांनी त्रस्त व्हाल. या राशीच्या नोकारदार मंडळीनी आपल्या कामात कसूर करू नये. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी नम्रतेनेच वागावे. तसे न घडल्यास कदाचित घरी बसण्याची पाळी येणेही संभवते. जपा.  बुध-शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काही कर्तृत्ववान व भाग्यवंत मंडळीना महिन्याच्या शेवटच्या दहा दिवसांत मानाचे स्थान, धनलाभ, प्रतिष्ठा, भूमिलाभ असे काही तरी मिळू शकेल. पण रवि-मंगळ या तप्त ग्रहांच्या प्रतिकुलतेमुळे अनारोग्य होईल व उष्णताविकार बळावण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना मूळव्याधीचा त्रास तर काहींना अन्य उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या काही मंडळीना असह्य मानसिक ताण वा शारीरिक अपार कष्ट सहन करावे लागतीलसे दिसते. शिवाय विषभय, जलभय व अपघातभय आहेच. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मात्र सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून मनापासून अध्ययन करणे जमले पाहिजे.. तसेच विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरून संपन्न होतील. काहीना वाहनसुख मिळेल तर काहींना नवे मित्र प्राप्त होतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील.

**(५) सिंह -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना, तसेच वकिली, सल्लागारी व्यवसाय, उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होणार आहे. म्हणून जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घ्या. पण महिन्याचे पहिले तीन दिवस मात्र मनस्तापदायक जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या युवकांना मनासारखी उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळेल.  महिन्याचा उत्तरार्ध बौद्धिक सोडून इतर कार्यक्षेत्र असणारांना मनस्ताप देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने भागीदारीत बाधा तेणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर यशाची खात्री नाही. सतत सावधानतेनेच आचरण करा. अपघातभय आहेच. जपा. असह्य मनस्तापामुळे शारीरिक उषणता भडकून अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना ताप येणे, काहीना अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी कसला तरी आजार त्रस्त करील. जपा. दांपत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद, वाद, कटकटी अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. अशा परिस्थितीत आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. विविध कारणांनी

अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यताही दिसत नाही. भावंडविषयक एखादी चिंताजनक घटना घडल्यास बंधुसुखात बाधा येणे शक्य दिसते.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना वैवाहिक व कौटुंबिक सुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालूच असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत सहनशील बनून व मनावर संयम ठेवून नम्रतेचे आचरण करणेच अगत्याचे होईल. आर्थिक चिंता, कौटुंबिक कलह, संततीचे आजार व अपप्रचारासारख्या सतत मनस्ताप देणाऱ्या अनिष्ट घटनांना तोंड देता देता थकून जाल. या राशीच्या काही मंडळींना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. ताप येणे, फ़ोड येणे संभवते. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. अशा परिस्थितीत या राशीच्या काही मंडळीना उगीचच आपल्याला कसला तरी आजार झाला असल्याची भावना होईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीत सुधारणा होईल, त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्यही सुधारेल. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, विरोधी परिस्थितीवर मात करून अपेक्षापूर्ती करू शकाल. वैवाहिक जीवनात मात्र जीवनसाथीचे लहरी विचित्र आचरण, मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायातही मतभेद वा संशय अशापैकी कारणांनी बाधा येणे शक्य आहे. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे दिलासा मिळू शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सर्व प्रकारच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील झाले असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत कौटुंबिक जीवनात सतत मनाविरुद्ध घडत असलेल्या घटनांमुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावणार आहे. विशेष करून वातविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना मुदतीचा ताप येणे, काहींना असह्य डोकेदुखीचा त्रास किंवा मेंदूविकाराचा त्रास होणे संभवते. कौटुंबिक त्रास व भांडणे यामुळे गृहसौख्यात बाधा येणे साहजिक आहे. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या ज्या मंडळींकडे बागायत शेतीवाडी आहे त्यांना अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अनारोग्य व अन्य कारणांमुळे अडथळे निर्माण होणे संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख लाभणेही कठिण होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दांपत्यजीवनातील सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलणेच सुखाचे होईल. अशा परिस्थितीत या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मपत्रिकेत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहींना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धन प्राप्त होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल. तसेच नियमित हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करावे, हे उत्तम.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना सध्या शनि ग्रहाच्या साडेसातीचा त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अहंकारी स्वभावाला मुरड घालून व मनावर संयम राखून घडणारे ते सहन करूनच प्रतिकुल काळ वाहून जाऊ देणेच सुखाचे होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शुक्राच्या अनुकुलतेमुळे नोकरी-व्यवसायात अपेक्षापूर्तीचे समाधान मिळेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-

ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना जन्मकुंडलीतील योगानुसार धनलाभ, भूमिलाभ, मान, प्रतिष्ठा असे काही तरी मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे महिन्याचा पूर्वार्ध सुखासमाधानाचा जाईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेसंबंधी किंवा स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. त्यामुळे नैराश्य येऊन अनारोग्य होणे संभवते. जपा. कलाक्षेत्राशी संबंधित असलेल्या या राशीच्या विद्यार्थ्यांना व साहित्यिकांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांनाही या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. तसेच प्रवासाचे योगही संभवतात. श्रद्धापूर्वक नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्याचा उत्तरार्धच सर्व प्रकारे अनुकुल होणार आहे. या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या विचित्र झाला असावा, असे वाटते. यांना आहे त्यात सुखसमाधान लाभत नाही. कारण सतत तक्रारी , कोणाशीही पटवून न घेणे ही वृत्ती. त्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होईल. जपा. अशा परिस्थितीत वाढत्या खर्चाची चिंता, आर्थिक नुकसान, आप्तेष्टांशी  भांडणे असे काही घडल्यास कुटुंबातील कोणासच गृहसौख्य व वास्तुसुखही लाभणार नाही. यामुळेच शारीरिक उष्णता भडकून डोळ्याची दुखणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात फ़ारशी बाधा येणार नाही, असे वाटते. महिन्याचा उत्तरार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अतिशय अनुकुल होईल. विविध प्रकारचे लाभ होतील. धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल. कर्तृत्व सिद्ध होईल; आणि अशा काही कर्तृत्ववान मंडळीना मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होईल. वरिष्ठ अधिकारी कौतुक करतील. त्यामुळे आर्थिक लाभही होणारच. काही मंडळीना भूमिलाभ होणेही शक्य आहे. विशेष करून चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना व अध्यात्मात रस असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरुकृपेने आरोग्य उत्तम राहील. काही मंडळीना परदेशवारीचे योग येतील. पण या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात विविध कारणांनी अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर दररोज बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याची ग्रहस्थिती फ़ारशी अनुकुल नाही; असेच म्हणावे लागेल. रवि-मंगळ-नेपचून पूर्णपणे व काही प्रमाणात शनि ग्रह प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे असह्य मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. उष्णताविकार बळावतील व घसा, दात, दाढा, मान दुखणे, डोळे तळावणे अशापैकी दुखणी उद्भवण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी भावविचारांचा प्रक्षोभ होऊ न देता मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करावे. तेच सुखाचे होईल. प्रतिकुल ग्रहांमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यातही बाधा निर्माण होऊ शकेल. जपा. विशेष करून आर्थिक समस्या त्रस्त करतील. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळाची प्रतिकुलता सुसह्य होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक

व लाभदायक होईल. काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. प्रेमसंबंध व स्नेहसंबंध दृढ होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल व मनापासून अभ्यास केल्यास परीक्षेत उच्च यश प्राप्त होईल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना मात्र प्रतिकुल काळाशी मुकाबला करतच काळ व्यतीत करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत हळवी, कोमल झाली असून मानसिक संवेदना अतिशय शीघ्र होत असल्याचे जाणवते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी या राशीच्या मंडळीना गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत स्वभाव संतापी, हेकट, तिरसट, अस्थिर, चंचल, अविचारी, हट्टी होणे साहजिक आहे. पण या राशीच्या मंडळीनी जिभेला लगाम घालूनच इतरांशी संबंध ठेवावा; नपेक्षा अधिक मनस्तापच सहन करावा लागेल. असह्य मनस्तापामुळे या राशीच्या काही मंडळीना गलितगात्र करणारी थकावट जाणवेल. रक्तदाब, ह्रदयविकार असणारांनी भावविचारांचा क्षोभ होऊ देऊ नये. मन शक्यतो शांत ठेवून सोशिक बनावे. अध्यात्मसाधनेत रस असणारांनी तर आध्यात्मिक उपासनेतच अधिक रमावे. तेच सुखाचे होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. सामान्य नोकरी, व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळीना श्रम, कष्ट करून व दगदग सहन करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी झगडावे लागेल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. प्रवासयोग संभवतात.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी, अस्थिर असा घडला असावा, असे वाटते. शिवाय कोणाचा धाक व दडपणही सहन होत नसावे. अशा परिस्थितीत मंगळ, बुध, नेपच्यून हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून रवि ग्रहही महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुलच होणार आहे. त्यामुळे सतत असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांशी मुकाबला करतच महिन्याचा काळ व्यतीत करावा लागणार आहे. त्यामुळे गहरे नैराश्य येऊ शकेल. आर्थिक चिंता, भांडणे, गैरसमजुती, मानहानी, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास, अनारोग्य यांमुळे बेजार व्हाल. पण महिन्याच्या पूर्वार्धात रवि-गुरु-शुक्र शुभ योगामुळे मनोनुकुल घट घडतील व मनाला दिलासा मिळेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा केवळ पूर्वार्धच अनुकुल असल्यामुळे त्यांनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या कर्तृत्वसंपन्न मंडळींना बढती, उच्च पद, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. अपेक्षित अर्थलाभ होईल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय करत असणारांनाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असेल. नंतर परिस्थिती प्रतिकुल होईल. या राशीच्या लेखकांचे साहित्य प्रकाशित होईल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना त्या मानाने काळ बरा जाईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. गुप्त पोलीसखात्यातील नोकरांना काळ अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. जपा.

=====00000=====